







# रंग ईशान्येचे

डॉ. नीलिमा कुलकर्णी







ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# रंग ईशान्येचे

(प्रवासवर्णन- आसाम, अरुणाचल, मेघालय)

## लेखिका : डॉ. नीलिमा कुलकर्णी

रंग ईशान्येचे

लेखिका - डॉ. नीलिमा कुलकर्णी

Address - D/28, palm Acres Society, M. Phule Road, Mumund( E), Mumbai -400 081.

Phone - 09619911705.

Mail - drneelimakulkarni@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

फोन- 7757031933

प्रकाशन : २९ जानेवारी २०२५

©esahity Pratishthan®2025

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

**हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.**

# डॉ. नीलिमा कुलकर्णी.



MSc; MSc; PhD; DHE; PGD in NGO managemant; successfully completed certificate course in translation skills ( English-Marathi) by IIKEM, Thane, Maharashtra.

Retd. Head. Dept of zoology, Vaze college, Mulund, Mumbai.

अध्यक्ष, “ हरियाली ” (मुलुंड विभाग), २०१७ - 2023.(हरियाली ही पर्यावरण क्षेत्रात गेल्या २८ वर्षापासून काम करणारी स्वयंसेवी संस्था आहे).

निसर्ग आणि प्राणिशास्त्र अभ्यासक

**शैक्षणिक**

- ३९ वर्ष ज्ञानदानाचे काम , (स्नातक आणि स्नातकोत्तर)
- निसर्ग आणि पर्यावरण क्षेत्रात संवर्धनाच्या दृष्टीने विद्यार्थ्यांबरोबर अनेक उपक्रम राबवले.
- (२ विद्यार्थ्यांना पी एच डी साठी आणि ३ विद्यार्थ्यांना एम एस्सी साठी मार्गदर्शन
- अनेक विद्यार्थ्यांना प्रकल्पासाठी मार्गदर्शन मुंबई विद्यापीठाचे चार संशोधन प्रकल्प
- अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये वैज्ञानिक संशोधन पेपरचे वाचन
- वैज्ञानिक संशोधन पेपर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय जर्नल मध्ये प्रसिध्ध
- Lap lambert या जर्मनी येथील आंतरराष्ट्रीय प्रकाशकाकडून संशोधन सह्लेखका बरोबर प्रसिध्ध)

- प्राणिशास्त्र विषयातील पाठ्यपुस्तके प्रकाशित - २०१५, २०१६, २०१८, २०२२
- हिमालय प्रकाशन - College Zooloy – 1, College Zoology – 2, Revised
- ऑन लाईन तसेच ऑफ लाईन परिषदांमधून सक्रिय सहभाग-
- अनेक शाळा - महाविद्यालयातून अतिथी व्याख्याता म्हणून आमंत्रण
- BOS सदस्य, एम एस्सी - KC महाविद्यालय आणि विद्यापीठ

**पुरस्कार** –

- ‘राम गणेश गडकरी’ प्रथम पारितोषिक (मराठी विषयासाठी) मानकरी, गुजरात १९६९
- राज्य मेरीट स्कॉलरशिप, १९६९
- राष्ट्रीय मेरीट स्कॉलरशिप, गुजरात १९७३
- यु जी सी मेरीट स्कॉलर १९७५
- बेस्ट NSS प्रो. ऑफीसर ( सेन्ट्रल सबर्ब) २००६.
- राज्यस्तरीय निबंध स्पर्धांमध्ये पारितोषिके २००३, २००४ , २००७
- “पर्यावरण स्नेही” पुरस्कार, मुलुंड २०१७
- महाराष्ट्र टाइम्स तर्फे एवोक लेखकांचा सत्कार
- समर्थ भारत व्यासपीठ, ठाणे तर्फे देण्यात येणारा 'ती' पुरस्कार - २०२४


**लेखन**


- प्राणी, निसर्ग आणि पर्यावरणाला केंद्रस्थानी ठेवून १९९० पासून लिहायला सुरुवात केली. आता पर्यंत लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स, सकाळ, विवेक, आपलं पर्यावरण, या अग्रगण्य दैनिक, तसेच मासिकातून विपुल लेखन केले या बरोबरच २००० साला पासून आकाशवाणीच्या विविध कार्यक्रमासाठी पर्यावरण विषयक लेखन केले. सर्व मिळून आता पर्यंत १००० पेक्षा अधिक लेख प्रसिद्ध
- “कुमारकोश”, विश्वकोश साठी नोंदींचे लेखन
- अनेक शाळा, महाविद्यालय, संस्था येथे पर्यावरण विषयक अतिथी व्याख्याने
- esahity – 3 पुस्तके प्रकाशित
- esahity साठी ६ ऑडीयो पुस्तके – विविध लेखकांसाठी अभिवचन
- स्थंभ लेखन - जीवजागर ( साप्ताहिक विवेक), जीवजागर ( आपलं पर्यावरण ),
- लोकसत्ता - कुतूहल २०२०, कुतूहल २०२२, कुतूहल 2023
- महाराष्ट्र टाइम्स - एवोक साठी लेखन -२०२३, २०२४

डॉ. नीलिमा कुलकर्णी यांची ई साहित्यवर प्रकाशित तीन पुस्तके वाचण्यासाठी क्लिक करा

## प्रवासवर्णन (esahity.com)




डॉ. नीलिमा कुलकर्णी यांची ई साहित्यवर 5 Audio पुस्तके ऐकण्यासाठी क्लिक करा

## ऑडिओ (esahity.com)

# रंग ईशान्येचे

भारताच्या उत्तर-पूर्वेकडील भागातील राज्यांना इंग्रजीत – सेवन सिस्टर्स या नावाने ओळखले जाते ... आपल्या भारतातील उत्तर-पूर्वेकडील ही राज्ये.. काही दुर्गम, काही दुर्लक्षित तर काही दोन्हीही, परंतु निसर्ग सौंदर्याने नटलेली, देखणी... बरेच दिवसांपासून देशातील या भागात जाण्याची इच्छा होती आणि अचानक आमच्या एका मित्रांकडून गार्गी टुर्सचा पर्याय उत्तम आहे असे समजले. आता सातही राज्ये एकदम करायची की आधी 3 आणि उरलेली नंतर... यावर विचार सुरू झाला. आसाम, मेघालय आणि अरुणाचल अशी 3 राज्ये एका वेळी करता येतील आणि ही टूर १२ दिवसांची असेल असे समजले. आमचा निर्णय झाला आणि आम्ही निघालो.

आम्ही मुंबईहून विमानाने गुवाहाटीला पोहोचलो. आसामची आधीची राजधानी, आता राजधानी आहे डिसपुर. आमची मुंबई – गुवाहाटी फ्लाइट होती १ तास ५० मिनिटांची. जातांना डावीकडे हिमालयाच्या रांगा दिसू लागल्या की आपल्याला आता हिमालयाचे जवळून दर्शन होणार या विचारानेच खूप छान वाटते असे आम्हाला सांगितले होते. अर्थात हिमालयाच्या रांगा फारश्या कळल्या नाहीत. एरवी मुंबईला राहणारा माणूस कधी पाहणार हिमालय!

एक आसामी ड्राईवर आम्हाला न्यायला आला होता. त्याने आम्हाला हॉटेल वर सोडले. तो बोलका होता आणि त्याला माहितीही खूप होती. तो अविनाश यांच्याबरोबर अनेक वर्षे काम करीत होता. विमानतळापासून १८ की. मी. वर आमचे हॉटेल होते. गुवाहाटी शहर तसे गजबजलेले, वाहनांनी भरलेले, आणि एकूणच गर्दी असलेले शहर. त्यामुळे मुख्य शहरापासून ५-६ की. मी. वर असलेले आमचे हॉटेल आम्हाला आवडले. हॉटेल भार्गवा.

हॉटेलकडे जातांना आम्हाला वाटेत एक दीपकबीर नावाचे पक्षी अभयारण्य लागले. तेथे अनेक स्थलांतरित पक्षी पाहायला मिळतात. अगदी सायबेरियन क्रेन्स सुध्धा. आम्ही मात्र तेथे थांबलो नाही. गारचुक भागापासून २ की. मी. वर आमचे हॉटेल होते.

एक गोष्ट जाणवते ती ही की येथील लोकांचे उच्चार ‘ओकारांत’ असतात. आसामी भाषा बंगाली, ओडिसी भाषेच्या जवळची वाटते. साधारण काय बोलणे सुरू आहे हे कळते तरी, याच्या उलट दक्षिणेकडील भाषा- काही म्हणता काही कळत नाही.

हॉटेल वर थोडासा आराम करून तेथून जवळच असलेले बालाजीचे मंदिर पाहायला गेलो. अप्रतिम देऊळ. स्वच्छ, नीटनेटके आणि श्रीमंत... रत्नजडीत बालाजी...या देवळाला पूर्वेकडील बालाजी असेच म्हणतात. मुख्य गावात जाण्यास रिक्शा मिळाली असती पण ट्राफिक मुळे जाण्या-येण्यातच वेळ गेला असता.



येथील गोड पदार्थ म्हणजे पीठा, पेठा नव्हे, तसेच गोड्या पाण्यातील, ब्रह्मपुत्रेतील मासा म्हणजे बडाली किवा आडी फिश. रोहू मासा इथे फार लोकप्रिय असावा. आम्ही रोहू खाल्ला पण चव थोडी वेगळी होती, कदाचित तेल वेगळे असेल.

आसामी माणसे चांगली वाटली. खरे म्हणजे सगळीच माणसे चांगली असतात. पण एक आहे, उत्तर-पूर्वेकडील माणसं थोडीशी तापट वाटतात, त्यांचा सुर थोडा चढा असतो, असे वाटते.

हवेत गारवा जाणवू लागला होता.

आसाममध्ये चहाचे खूप उत्पन्न आहे. पण तरीही गुवाहाटी सारखे मोठे शहर सोडले तर नोकऱ्या तशा कमीच ... आर्थिक विकासाच्या बाबतीत आसामचा नंबर खालून ४ था किवा ५ वा लागतो.

जवळच बंगला देश सीमा असल्याने येथे लष्कराची उपस्थिती जाणवण्या इतकी जास्त. लष्कराच्या कोणत्याही वाहनाचा फोटो काढायचा नाही हा नियमच आणि तो पाळणे चांगले. एरवी आपल्याला बाहेर गेले की सतत फोटो काढण्याची खाई-खाइ असते आणि हल्ली मोबाइल मुळे तर ते आणखी सोपे झाले आहे.

दुसऱ्या दिवशी आमचा कालचा ड्राईवर आम्हाला नेण्यास येणार होता. आम्ही सकाळी ८:३० वाजता तयार होतो. आम्ही आता काझीरंगाकडे प्रवास करणार होतो. गुवाहाटी ते काझीरंगा अंतर आहे २५६ की. मी. इथली गम्मत म्हणजे रस्त्याची एक बाजू मेघालयमध्ये तर दुसरी बाजू आसाम मध्ये. मेघालय मध्ये पेट्रोल, डिझेल स्वस्त, म्हणून आम्ही पण रस्त्याच्या पलीकडून पेट्रोल भरून घेतले.

आम्ही चाललो होतो राष्ट्रीय महामार्ग नंबर ३७ ने. हा महामार्ग म्हणजे उत्तर-पूर्वेच्या सर्व राज्यांचा जीवनमार्ग आहे. आता त्याच रस्त्याला ए एच १ असे म्हणतात. कारण तो आहे एशियन हायवे १. हा महामार्ग बँकॉक, मायनमार, थायलंड मलेशिया वरून सिंगापूर पर्यन्त जातो. अजून इमिग्रेशनची सुविधा सुरू झालेली नाही. आम्ही तितलीया, जागी रोड, देवसाल, मकरिया, राहा, नागाव, बाणीपुर, बगोरी, असे करत काझीरंगाला पोहोचणार होतो.

रस्त्याने सुपारीची आणि बांबूची खूप झाडे दिसली. इथे सुपारी जमिनीखाली गाडून ठेवतात आणि ती मऊ सुपारी खायची. आमच्या ड्राईवरच्या  मते शिलोंग मधील सुपारी, तांबूल सकट खाल्ली की चक्कर आल्यासारखे  होते.

आसाम मध्ये ४ एप्रिल २०१६ ला निवडणुका जाहीर झाल्या होत्या. आम्ही तेथे होतो २२ मार्च च्या सुमारास, राजकीय सभांना आणि मेळाव्यांना जोर आला होता. कोंग्रेस पक्षाचा जोर दिसत होता. रिक्शा, टमटम, बस, ट्रक अशा सर्व वाहनांमध्ये भरलेली माणसे. या मध्ये बायकांचे प्रमाण पण बरेच होते. माणशी १५० रूपयांचा भाव होता असे ड्रायवर सांगत होता. आम्ही पण जवळजवळ अर्धा तास त्यामध्ये अडकलो. येथे साग, बांबू आणि सुपारी जास्त

प्रमाणात... आम्ही साधारण १२:४५ ला काझीरंगाच्या हॉटेल वर पोहोचलो. दूसरा ग्रुप अजून आला नव्हता , तो ८ जणांचा ग्रुप २ राज्ये बघून येणार होता. त्यांची टूर होती १९ दिवसांची... हॉटेल चांगले होते.



एकूण आसाम मध्ये पाण्याची रेलचेल होती. आम्हाला, पाणी कपातीत राहणाऱ्यांना ती जरा जास्तच जाणवत होती. ग्रुप म्हटलं की विविध प्रकारच्या व्यक्ति हे ओघानेच आले.  कोणी सरसकट, कोणी गमतीशीर, कोणी अडेल, कोणी घाबरट, कोणी सरळ मार्गी, कोणी बोलण्यात खुसखुशीत, कोणी बालिश  तर कोणी अगदी लबाड, असे विविध स्वभाव असलेली माणसे... खरे म्हणजे या विविधतेमुळेच तर मजा येते. एकमेकांना प्राथमिक माहिती विचारत जेवण आटोपले. आमचे हॉटेल होते एमराल्ड. आमचे हॉटेल होते कोहोरी या भागात.जेवणा नंतर थोडा आराम करून आम्ही तेथून १-२  की. मी. वर असलेले **'एथनिक विलेज'** पाहायला गेलो.



या ठिकाणी आसाम मधील **कर्बी** आणि **एंग्लिंग** या, जंगलात राहणाऱ्या जमातीची घरे, त्यांची दिनचर्या, त्यांचा पेहराव या विषयीची माहिती फायबरच्या पुतळयांतून दाखविली आहे. हे विलेज छान होते पण दुर्लक्षित वाटले, स्वच्छता नव्हती, त्या पुतळयांची कोणी काळजी घेत असावे असे दिसत नव्हते.. सर्व घरे उंचीवर होती, आसाम मध्ये ब्रंहापुत्रेला पुर येतो त्यासाठीच ही घरे अशी जमिनीपासून उंचीवर बांधली होती. हीच पडझड झालेली आवारे जर छान ठेवली असती, अगदी जुजबी तिकीट लावून, तर जास्त चांगली टिकतील असे वाटून गेले



तेथून परत हॉटेलवर जाण्याआधी आम्ही तेथील स्थानिक बाजारातून काही छोटी खरेदी केली, म्हणजे खास करून लाकडाचे गेंडे आणि चहा... रात्री क्रिकेट मॅच होती, पाकिस्तान आणि न्यूझीलंडची. दुपारी हॉटेलच्या आवारात खूप पक्षी दिसले खास करून मी खूप दिवसांनी

पाहिलेला व्हाइट व्हागटेल. खूप मजा आली त्याला पाहून... रात्री जेवण करून पेंगत मॅच पाहत झोपलो. एक गोष्ट सांगावीशी वाटते ती म्हणजे गार्गी टुर्सचे हॉटेलशी असलेले संबंध चांगले होते. अविनाश व्यावसायिक तर आहेतच पण त्यांचे प्रत्येकाशी आपुलकीने वागणे त्यांना मार्क देवून जाते. त्यांची हॉटेल्स, त्यांचे ड्रायव्हर, त्यांचा प्रत्येकाशी असलेला संवाद जाणवतो, आणि त्यामुळे त्यांच्या बद्दल एक प्रकारचा विश्वास वाटतो, जो खरा ठरतो. त्यांची अभ्यासू वृत्ती त्यांना जास्त व्यावसायिक बनविते. असो.

दुसरे दिवशी आम्हाला सकाळी ५ : १५ वाजता एलिफंट राईड साठी निघायचे होते. सकाळी ४:०० वाजता वेकप कॉल  होता. येथे सकाळी सव्वा पाच आणि सव्वा सहा अशा हत्तीच्या दोन फेऱ्या असतात. आम्हाला अर्थात सव्वा पाचची ट्रीप होती. काल रात्री पाऊस झाला होता त्यामुळे बाहेर खूप थंडी असेल अशी अपेक्षा होती . पण त्या मानाने थंडी साधारणच होती.

आम्ही बरोबर ४:३० ला चहा घेऊन तयार होतो. आम्हाला वेस्टर्न रेंज च्या **बगोरी**या गेटशी जायचे होते. ते हॉटेल पासून १२ की. मी वर होते. आमच्या बसने आम्ही तेथे पोहोचलो. एका छोट्याश्या पूलावरून हत्ती होते तेथे पोचलो.

आसाम तसे गरीब राज्य. पाणी भरपूर आहे पण शेती फारशी नाही. गौहतीहून येतांना वाटेत काही ठिकाणी भात शेती दिसली. शहरी भागात लोक नोकरीसाठी येतात. काजिरंगाला येतांना थोडीफार शेती दिसली, भाताची. येथील

लोकांचे अन्न भात आणि मासे. गुवाहाटी सारख्या मोठ्या शहरात सुध्धा नोकरी हेच मुख्य उपजीविकेचे साधन असावे असे दिसते. इथे आसाम मध्ये पाणी भरपूर आहे असे दिसते. मुंबई – पुण्या कडील माणसांना सध्या उन्हाळयात पाणीकपातीचा सामना करावा लागतो, आणि त्या पार्श्वभूमीवर आसाममध्ये पाणी मुबलकच म्हणावे लागेल. याचा उल्लेख पुन्हा करावासा वाटला कारण, आमच्या होटलच्या वरील टाकी ओवरफ्लो झाली होती, पाणी वाहत होते, पण कोणाला फारशी चिंता नव्हती. शेवटी आम्हीच त्यांना सांगितले.

आम्ही पूर्वी नेपाळ मध्ये गेलो होतो तेव्हा हत्तीवरून गेंडा पाहायला गेलो होतो, चितवन राष्ट्रीय उद्यानात ... त्यावेळची हत्तीवर बसण्याची आठवण जरा वेगळी होती. इथे हत्तीवर बसणे एकदम सोपे होते. हत्तीच्या दोन्ही बाजूला बसण्याची सोय. ३ – माणसे एका बाजूला अशी. चढणे पण एकदम सोपे. चढणे म्हणजे नुसते बसणेच ... हत्ती सुध्धा इतके शहाणे असतात की बरोबर त्या प्लॅटफॉर्मच्या समोर येऊन उभे राहतात. एका बाजूची ३ माणसे बसली की हत्ती वळून उभा राहणार, दुसऱ्या बाजूच्या माणसांना बसवण्यासाठी. आमची राईड ५० मिनिटांची होती. हत्ती स्वतःचे वजन आणि जास्तीचे ६ माणसांचे साधारण ३५० किलो. वजन घेऊन चालत होता. त्याला पाहून गतकाळातील ‘ममोथ’ ची आठवण झाली. ते प्राणी किती अजस्त्र असतील याची थोडीफार कल्पना आली. गेंडे अगदी जवळून पाहता आले. एक आईबरोबरचे पिल्लू पण दिसले. अतिशय गोड, अर्थात पिल्लं सगळीच गोड असतात. एलिफंट ग्रास या उंच वाढणाऱ्या गवतातून हत्ती शांतपणे चालत असतो, आपण जंगल अनुभवत राहायचे. साधारण मार्च महिन्यात हे गवत जाळून टाकतात आणि त्यामुळेच गेंडे अगदी जवळून दिसतात.



हा युनिकोर्निस – म्हणजे एकशिंगी गेंडा आता फक्त भारतातील आसाममधील काझीरंगा मध्येच सापडतो. पूर्वी मुघलराजे गेंडा आणि हत्ती यामध्ये साठमारी लावत आणि त्यामध्ये गेंडा जिंकत असे. आय. यू. सी. एन च्या यादी प्रमाणे हा गेंडा आता ‘असुरक्षित’ या श्रेणीत आहे. या गेंड्याची त्याच्या शिंगासाठी शिकार होते. शिवाय

आसाममधील पुरामध्ये सुध्धा अनेक गेंडे मरतात. गेंडया बरोबर बार्किंग डियर, वाइल्ड बोर (जंगली डुक्कर), सांबर, हरिण असे काही वन्य प्राणी सुध्धा दिसले.



एकूण राइड मस्त होती. आम्ही हत्तीवरुन उतरलो आणि फोटो वगैरे काढले. काझीरंगाला यायचे ते गेंडे पाहायला, ते तर छान जवळून पाहून झाले होते. या जंगलात आत्ता २२४० इतके गेंडे आहेत आणि ११० वाघ आहेत. वाघ येथे फार उशिरा आणले गेले. वाघ येथे फार कमी वेळा दिसतो, अगदी जिप्सी मधून सुध्धा... सकाळी ७ :३० ला तर आम्ही हॉटेलवर परत. दुपारी ३ वाजता जिप्सीची फेरी होती त्यामुळे अंघोळ संध्याकाळीच करायची असे ठरविले.

हॉटेलच्या आवारात खूप पक्षी होते. सर्वात छान दिसला तो व्हाईट वॅगटेल, काही वर्षांपूर्वी मी नंदुर- मधमेश्वरला पहिला होता. जेवण आणि थोडी झोप आटपून आम्ही बरोबर २:३० ला तयार होतो. ऊन खूप लागेल, टोपी घाला, स्कार्फ बांधा, अशा सूचना अविनाश देत होते. मी वेगवेगळया उद्यानातून इतक्या सफारी केल्या, पण मला कधी त्रास झाला नव्हता. त्यामुळे मला जरा आश्चर्यच वाटत होते. अर्थात, आम्ही सर्व जेष्ठ नागरिक आणि ते सहलीचे ऑर्गनाइजर – त्यामुळे त्यांनी अशा सूचना देणे साहजिक होते. आम्हाला दोघांनाही टोपी अथवा मास्कची गरज वाटली नाही. चांगल्या तब्बेती दिल्या बद्दल आई-वडिलांचे आभार मानून आम्ही निघालो.

वाघ दिसण्याची अपेक्षाच नव्हती, पण जंगलाचा छान अनुभव आला. होग डियर, स्वाम्प डियर, म्हशी, बायसन, रानडुक्कर असे काही जंगली प्राणी दिसले. पक्षी मात्र भरपूर प्रकारचे दिसले. विशेष उल्लेख करायचा तर एमराल्ड डव्ह! इतर पार्कच्या तुलनेत या पार्क मधील रस्ते फारच वर-खाली आहेत. राइड संपवून परतलो हॉटेलवर. आमच्या हॉटेलचे नावही एमराल्डच होते. त्याचा चहा एकदम मस्त!

एकूण टुर मस्त चालली होती. ज्यांनी सकाळी आंघोळ केली नव्हती, त्यांनी अंघोळी उरकल्या आणि ७ वाजता आम्ही सर्व ट्रायबल डान्स पाहायला जमलो होतो . बिहू नावाचा एक सण असतो आसाम मध्ये, त्यावेळचा डान्स म्हणून बिहू डान्स. सुंदर डान्स, पण “कंबरतोड” डान्स, त्या मुली लीलया कंबर वाकवत , मागे हात ठेवून नेटकेपणाने छान नाचत होत्या, शेकोटी पेटली होती, हवेत छानशी थंडी होती, आणि सर्वजण मजेत होते. आम्ही त्या ग्रुप बरोबर फोटो काढून घेतले. त्यांनी घातलेला आसामी पेहरावातील प्रत्येक गोष्टीचे नाव त्यांनी सांगितले. आमच्या पैकी काहींनी त्यांच्या बरोबर नाचण्याचा प्रयत्न- नुसता प्रयत्न केला.



२४ मार्चला सकाळी निघालो बोमडीलाकडे. आमची बस टेम्पोट्रवेलर मस्त होती, आरामदायी होती. आमचा ड्राईव्हर कमल पण मस्त - उत्तम आणि सेफ ड्रायव्हिंग. रस्त्यावर अनेक ठिकाणी चहाचे मळे दिसत होते. हा चहा उतारावर नव्हता. बस बाजूला थांबवून आम्ही चहाच्या मळयात फोटो काढले. सपाटीवरचा चहा आणि उतारावर होणारा चहा या मध्ये फरक असतो. डोंगर उतारावर होणारा चहा चांगल्या प्रतीचा असतो. असेही कळले की सर्वात उत्तम चहा ७५,००० रु. / किलो इतक्या चढया भावाने विकला जातो. चहाच्या झुडुपाची सर्वात वरील दोन पाने सर्वात महत्वाची असतात. तीच वाळवून, जाळून प्रक्रिया करतात आणि चहा तयार होतो. या प्रवासा दरम्यान ब्रह्मपुत्रेवरील साडे तीन की.मी. चा पूल हे आणखी एक आकर्षण होते. पुलाच्या दोन्ही टोकांना लष्कराची माणसे, म्हणून तेथून जातांना अजिबात फोटो काढायचे नाहीत असे आम्हाला बजाविण्यात आले. या राज्यांमध्ये एकूणच लष्कराची हालचाल खूप जास्त, त्यामुळे जवानांचा अथवा लष्कराच्या वाहनांचा फोटो काढायचा नाही अशी सख्त ताकीदच दिली होती अविनाशने. प्रचंड मोठे पात्र...अथांग, समुद्रच जणू, नजर पोहोचेल तोवर नदीचे पात्र. ब्रम्हपुत्रा ही नदी नाही तर नद आहे. ती बांगलादेशातून वाहते आणि कुठे जाते याचे तिला बंधन नाही. ही अशी बंधनं – आमची नदी, आमचे पाणी – घातली माणसानेच! ...



या पुलाचे नाव आहे कोलीआ भोमोरा सेतू. वाटेत आम्हाला नागाव लागले. एके ठिकाणी तेजपुर, अगरतला आणि गुवाहाटी असे फाटे होते.

या वाटेवरील बुऱ्हा पहार  नावाची जागा पक्षी निरीक्षणासाठी उत्तम आहे ... अनेक पक्षी निरीक्षक गिर्यारोहक, येथे भेट देतात.

येथील रस्ते मात्र उत्तम, बॉर्डर रोड ओर्गनाईझेशन आणि लष्कराने बांधलेले. असे जरी असले तरी या प्रदेशात विकास कमीच दिसतो. इतका सुंदर रस्ता असूनही टोल होता फक्त ४० रुपये. मला आपल्या मुंबई-पुणे एक्स्प्रेस्स वे च्या २०० रुपयांच्या टोलची आठवण झाली, रस्ता कसाही असो, टोल मात्र मजबूत घेतात.

आसाम मध्ये ५४ राष्ट्रीय उद्याने आहेत, त्यातील नामेरी हे विशेष महत्त्वाचे परंतु येणाऱ्या पर्यटकांसाठी पुरेश्या सोयी सुविधा नाहीत. त्यातून हा सर्व भाग बोडोंचा. गम्मत म्हणजे काही ठिकाणी ‘नो एलेक्ट्रिसिटी नो वोट’ असे फलक पाहायला मिळाले.

बालि पारा हा आसाम मधील शेवटचा जिल्हा. – येथून अरुणाचल प्रदेशची हद्द सुरू होते. अरुणाचल म्हणजे जेथे सूर्य सर्वप्रथम दर्शन देतो.

आता लष्कराची गडबड सुरू झाली, त्यांच्या जिप्स , ट्रक्स आणि त्यांचे कोन्वोय. दोन्ही प्रदेशांच्या हद्दीवरील गाव म्हणजे कामेंग नदीवरील भालूक्पोंग.

अरुणाचल मध्ये जाण्यासाठी परमीट लागते – एक आठवड्याचे, एक महिन्याचे  वगैरे... त्याला इंनर लाइन परमीट (आय एल पी ) असे म्हणतात. अविनाशने आमची परमीट्स आम्हाला दाखविली. परमीट वर तुमचे नाव, फोटो, येण्याचे कारण आणि किती दिवस राहणार अशी सर्व माहिती असते.

या प्रदेशाला लागून भूतान, चीन आणि मायनामार ( ब्रह्मदेश) यांच्या सीमा/सरहद्दी आहेत.  १९९२ च्या लढाईत, अगदी तेजपुर- अग्निगड पर्यन्त चीनी लश्कर आत शिरले होते, आणि आपण मारे 'हिन्दी-चीनी भाई भाई' च्या घोषणा देत गळ्यात गळे घालत होतो.

आम्ही १२ वाजता अरुणाचल मध्ये शिरलो. आता वाहनं , माणसं कमी झाली होती. फक्त लष्कराचे तळ आणि त्यांची वाहनं दिसत होती. लश्कर देशासाठी काय करतं, देशाने लश्कर का पोसावं – याचे उत्तर इथे मिळते.



येथील संख्येने सर्वात असलेली जनजाती म्हणजे मोनपा. ते शांगला भाषा बोलतात.

या प्रदेशात माणसे इतकी कमी आहेत की एका की.मी. ला सर्वसाधारणपणे फक्त १९ माणसं असे आकडे सांगतात.

इथे खाना म्हणजे फक्त भात, आणि बडा खाना म्हणजे भात, रोटी वगेरे सर्व...१:३० वाजता वाटेत जेवलो, सोलू येथे - घरगुती जेवण छान होते. सकाळी ८:३० ला निघालो होतो. खूप प्रवास होता,

तासनतास...किती डोंगर पार करीत होतो ते फक्त त्या कमल आणि अविनाश यांनाच माहीत. कमेंग नदीपासून घाट सुरू झाला तो सेसा टेंगा पर्यन्त.

टेंगा येथे मिल्ट्रीचा दूसरा मोठा कॅम्प आहे. पहिला नंबर लागतो काश्मीर मधील उधमपुरचा. मला वाटते आमच्या सारख्या सामान्य नागरिकांनी हा एवढा मोठा कॅम्प प्रथमच पहिला. जवानांचे जग लांबून सुध्धा इतके खडतर दिसते तर खऱ्या अर्थाने ते किती खडतर असेल याची कल्पना येते.

अनेक डोंगर पार करून अखेर आम्ही बोमडीलाला ८००० फुटावर पोहोचलो. तापमान साधारणतः ६ डिग्री होते. आमचे हॉटेल होते सेपोय, जे बोमडीलातील सर्वात चांगले हॉटेल आहे. हिटर आणि गरम पाणी हाताशी असल्याने मस्त झाले. अविनाशने दिलेली सर्व हॉटेल्स उत्तम होती. जेवण पण उत्तम. पुढील दिवशी सुध्धा १० तासाचा मोठा प्रवास होता. सकाळी ८:३० ला निघायचे होते. २५ मार्च २०१६ ला सकाळी ८ : ३० वाजता निघालो.

सर्वात प्रथम ४०० वर्ष जुनी १४ व्या कर्मालपाने बांधलेली मॉनेस्ट्री मेरागामा.

त्यांचा धर्मग्रंथ त्रिपीटाका सुध्धा पहायला मिळाला. गौतम बुध्धाचे २ शिष्य मध्यसंभवा आणि टेसोंगावरवपा यांनी खरे म्हणजे आशिया खंडात बौध्द्ध धर्माचा प्रसार केला.





तिथे आम्ही एक शब्द शिकलो – **ताशीदिलेक**– म्हणजे नमस्कार. मोंगपाचे सकाळचे तास सुरू होते. ते संपल्यावर त्या सर्वांनी शेवटी राष्ट्रगीत म्हटले, खूप छान वाटले.

या राज्यात अनेक ठिकाणी रंगीबेरंगी कागदांच्या पताका लावलेल्या दिसतात. पताका प्रसन्न वाटावे म्हणून लावतात. लाल रंगाच्या पताका असतील तर त्या दुख दर्शवितात.

मोनेस्ट्री पाहून आम्ही दिरांग व्हॅलीकडे निघालो. किती डोंगर पार करत होतो कोणास ठाऊक... तासनतास बस चालली होती घाटातून, डोंगरातून... आमचा कमल ड्राइव्हर मात्र कमाल होता.

दिरांग नदी काठी थोडे थांबलो, थंडगार पाण्यात पाय बुडवून बसलो, चकाकणारे दगड  गोळा केले. अडोश्याला सुध्धा जाऊन आलो. दिरांग व्हॅली मस्त होती. जमा केलेल्या दगडावर काहीतरी पेंटिंग वगेरे करण्याचा नुसता विचार... आमच्या ग्रुप मधील मुग्धा पेंटिंग वगेरे करते...गुप्ते जोडी बेंकर आहेत तर पाठक मॅडम गृहिणी ... पुन्हा एकदा जाणवले की अविनाश यांची टुर आखीव आहे, व्यवस्थित आहे.

जेवणाच्या वेळी समझाना या जागी, पद्मा नावाच्या हॉटेल मध्ये जेवलो. येथे चीन किवा तैवान प्रमाणेच जास्त करून स्त्रिया काम करतात. पद्मा ही एक खानावळ होती. इथेपण खाना अथवा बडाखाना असे सांगावे लागे, सर्विस एकदम झटपट... छान गरम गरम जेवलो आणि चाललो तवांगला.

वाटेत बैसाखी या ठिकाणी आर्मीचे केंटिन आहे. सर्वांनीच खरेदी केली – आर्मीचे टी शर्टस, हातमोजे, कानटोपी , बूट आणि असेच बरेचसे...मुंबईत आम्ही हे सर्व कधी वापरणार होतो कोणास ठाऊक! खरेदी संपवून निघालो सेला पास कडे... १३७०० फुटावर... आजूबाजूला डोंगर आणि न संपणारे नागमोडी रस्ते.

गोष्ट अशी सांगितली जाते खरे खोटे माहित नाही. सेला आणि पोला अशा 2 बहिणी होत्या. १९६२ च्या युद्धात चीनने आक्रमण केले आणि ते लश्कर घेऊन तवांग पर्यन्त आले सुध्धा... या दोघी बहिणी चिनी लष्कराच्या तावडीत सापडल्या. त्यांनी त्या दोघींना भारतीय लष्कराविषयी आणि दारूगोळया विषयी  माहिती विचारली. त्यांनी माहिती देण्यास नकार दिला. चिन्यांनी सेलाला गोळया घातल्या... त्याच जागेचे नाव **सेला पास.** दुसरी बहीण म्हणाली मी तुम्हाला माहिती देते.. परंतु त्यांच्या जेव्हा लक्षात आले की ही माहिती सांगणार नाही तेव्हा त्यांनी तिला सुध्धा सेला पास पासून काही अंतरावर गोळया घातल्या. देशासाठी बलिदान दिले दोघींनी. या दोन बहीणींचे एक मेमोरिअल आहे तेथे सर्वांनाच नतमस्तक व्हायला होते.

सेला पासला पोचलो, ऊंची मुळे श्वास घेण्यास थोडा त्रास होत होता असे वाटत होते मला – अविनाश यांनी साध्या, सरळ सोप्या सूचना दिल्या त्याचा खूप फायदा झाला. गाडीतून उतरल्यावर लगेच चालायला सुरुवात करायची नाही, घशाला कोरड पडली तर घोट- घोट पाणी प्यायचे , कानात दडे बसले तर थोडे पाणी प्यायचे, आणि दीर्घ श्वास घेत राहायचे वगैरे... अनुभवाचे बोल होते ते...

सेला लेकवर जाण्यासाठी साधारण ८०-९० पायऱ्या उतरून जावे लागते, मी हळू हळू गेले खाली...आम्ही नशीबवान होतो, आम्हाला हवा छान मिळाली, बर्फ होते पण बर्फवृष्टी नव्हती, शिवाय पाऊस नव्हता, पाणी गोठले नव्हते - त्यामुळे सर्वार्थाने आनंद घेता आला. चहुबाजुने बर्फाच्छादीत डोंगर, आणि इतक्या उंचीवर असलेले तळे, तळ्यात सोनेरी हंसांची जोडी... स्वर्ग बहुदा असाच असावा .



परत येतांना मला जरा दमल्या सारखे झाले, पण ठीक आहे...हा सेला पास म्हणजे जगातील दुसऱ्या नंबरचा इतक्या उंचीवरचा मोटरेबल रस्ता...तेथे अर्धा तास घालवून आम्ही निघालो **जसवंतगड** कडे. तेथे मेजर जसवंतसिंगांचे मेमोरिअल आहे. १९६२ च्या युध्दात त्यांनी चीनी आर्मीला ३ दिवस थोपवून धरले पण अखेर धारातीर्थी पडले. त्यांच्या बलिदानाला नमन करून बाहेर आलो.

तेथेच आर्मीने गरम चविष्ट समोसे आणि चहाची सोय ही केली होती. तेथेच जंतर मंतर ला जाऊन आलो आणि आमची ट्रवेलर पुढे निघाली. (जंतर मंतर म्हणजे ...कळले ना?). आता थंडी वाढू लागली होती. वाटेत तवांगचू नदी लागली जिचा उगम चीन मध्ये आहे.



तवांग ला पोचलो संध्याकाळी ६:३० ला. हॉटेलचे नाव होते तवांग रिजन्सी. हिटर आणि गरम पाणी याची सोय असल्याने थंडीचे फारसे टेंशन नव्हते. तेथे रात्री ९:१५ ला हिटर सुरू होत असे, न चुकता... नाहीतर काही खरे नव्हते. रात्री आम्ही दोघांनी न जेवण्याचा विचार केला. परंतु अविनाश-सचिन ने आग्रहाने निदान सूप तरी प्या असा नुसता आग्रह केला नाही तर सूप रूमवर पाठविण्याची व्यवस्था केली. अविनाश यांनी व्यावसायिकता आणि प्रेमळ आग्रह याचा सुरेख समतोल सांभाळला असेच म्हणावे लागेल.

दुसरे दिवशी म्हणजे २६ मार्च ला आम्हाला दुसऱ्या एका **मेंगटेनसो** या लेक वर जायचे होते.



आदल्या दिवशी रात्री  तापमान होते २ डिग्री. सचीन आणि अविनाश यांच्यातील समन्वय खूप चांगला होता.

सकाळी नास्ता करून ९ वाजता निघालो. सकाळी निघण्यापूर्वी एक चक्कर मारली बाजारात, कारण जुने मार्केट आमच्या हॉटेल पासून सुरू होत होते. थोडीशी किरकोळ खरेदी केली. त्या मार्केट मध्ये मीलट्री केंटीनचे पण एक दुकान होते. तिथे पण काही जणांनी खरेदी केली.

बरोबर ९ वाजता निघालो. १३000 फुटावर असणाऱ्या पांग टेंग सो  या लेकवर जायचे होते. रस्ते तसेच नागमोडी, थंड हवा, उंचीवर गेल्यावर बर्फ….. आज पण निसर्गाची आमच्यावर कृपा होती, कारण ऊन होते आणि रस्त्याच्या कडेला बर्फ पण होता. डोंगरांवर पण बर्फ... 'सेला' पेक्षा हे ठिकाण जास्त सुंदर होते. सर्व जण बर्फावरून खाली उतरून लेककडे जायला लागली. मी अर्ध्या वाटेवर थांबले. सुनील आणि अविनाश मला नेण्यास मागे फिरले परंतु मी अर्ध्या वाटेवरून परत फिरले. याचे एकमेव कारण म्हणजे मला पुन्हा चढण्याचे टेंशन होते.

अनेक बायकर्स दिसले आणि मला कौस्तुभची - माझ्या मुलाची आठवण झाली. (तो पण असाच २१ व्या वर्षी मोटरबाइकवरुन खरदुंगला पर्यन्त जाऊन आला). तेथे आम्ही १ तासभर होतो. खूप छान स्पॉट होता. बर्फात गेलेल्यांची धमाल चालू होती. ध्यानस्थ बसून, एकमेकांवर बर्फ फेकतांना, वेगवेगळया पोझेस देऊन फोटो काढणे सुरू होते. आमच्या ग्रुप मध्ये आम्ही ४ समवयस्क बायका होतो. आता आम्ही एकमेकींशी रुळलो होतो त्यामुळे मजा येत होती.

तेथून निघालो आणि पुढच्या ठिकाणी प्रयाण केले. तो होता छत्रपती शिवाजी पथ – कॅम्प. तेथील जवानांशी गप्पा मारल्या, त्यांची चौकशी केली, खूप छान वाटले. त्यांनाही सिविलियनसशी बोलून बरे वाटले असावे. विचार आला - आम्ही २ दिवसात थंडीने हैराण झालो होतो, जवानांना तर १२ महीने थंडीतच राहायचे, कामे करायची, व्यायाम करायचा आणि वेळ पडली तर जिवावर उदार होऊन शत्रूशी लढायचे... आमच्या बरोबर होती त्या अंजलीने आणि दत्तवाडकरांनी त्यांना पुन्हा  त्यांच्याबरोबर फोटो काढण्याची इच्छा व्यक्त केली, एखादी आठवण सांगायला सांगितली, परंतु जवानांनी नम्रपणे नकार दिला. आम्ही सांगू शकत नाही असेही म्हणाले. त्यांची राहण्याची सोय, बराक्स पाहिले... तेथे जवानांनी तयार केलेले मोमोझ आणि मसाला चणे खाल्ले. विचार आला, धन्य हे जवान, आज ते डोळ्यात तेल घालून आपल्या सरहद्दीचे रक्षण करतात म्हणून आपण आपआपल्या घरात शांतपणे झोपू शकतो. जवानांना टाटा करून आम्ही गेलो आणखी तवांग बुद्धिस्ट मॉनेस्ट्री पाहायला.



ही मोनेस्ट्री आणि येथील बुध्धाचा पुतळा खूप मोठा आहे. तवांगकडे येण्याच्या रस्त्यावरून सुध्धा तो दिसतो. मोनेस्ट्री पाहून आम्ही गेलो वॉर मेमोरिअल पाहायला.

१९६२ मधील चीन बरोबरील लढाईत सतत ३ दिवस लढा देत होते अनेक सैनिक. त्यातील २४०० सैनिक…मारले गेले. त्यांचे मोठे स्मारक बांधले आहे. प्रत्येक बटालियन मधून शहीद झालेल्यांची नावे, तिथे वाचायला मिळतात. मन भरून येते. कॅप्टन जसवंतसिंग हे देखील त्यातलेच…त्यांची शौर्य गाथा ऐकून आम्हाला भरून आले. आम्ही देशभक्तीपर गाणेही म्हंटले. तेथे आलेल्या एका सरदारजीने असेही सांगीतले की त्यावेळी जवाहरलाल नेहरूंनी केलेले मोठे ब्लंडर म्हणजे चायनाला दिलेली जागा… त्यांच्या कुटुंबात अनेक लोक सैन्यात होते, त्यांनी सैन्य जवळून पहिले होते… बरेचसे भारावून आम्ही हॉटेलला परत आलो जेवण केले आणि थोडा आराम करून वॉर मेमोरिअल मधील साऊंड अँड म्युझिक, लाइट – मुझिक शो पाहायला निघालो. खूप छान शो होता, भारावून टाकणारा….थंडी खूप होती, साधारण २ डिग्री वगैरे…कुडकुडत परतलो हॉटेलवर… जेवण पण मस्त होते. सकाळी निघायचे होते पावणे आठला ..तवांगला बाय बाय करून बोमडीला पर्यंतचा ८-१० तासांचा प्रवास होता..

२७ मार्च, सकाळी ब्रेकफास्ट करून पावणे आठ ला निघालो. आज प्रवासच प्रवास… ८-१० तास … प्रथम पोहोचलो ते जेंग या धबधब्या जवळ. हा साधारण १५० फुट उंचीचा फॉल . याला बॉन्ग बॉन्ग  फॉल असेही म्हणतात.



सेला पास वरील वितळणारा बर्फ असा १५० फुटांवरून उडी घेतो. मस्त होता , आम्ही फोटो वगैरे काढले. आमच्या शिवाय तेथे कोणीच नव्हते. परतीचा प्रवास तसाच होता, म्हणजे सेला लेक, जसवंत गढ, बैसाखी, शिवाजी पथ, समझाना ला जेवण आणि परत बोमडीला. एका रस्त्याने आम्ही सेला पासला पोहोचलो आणि दुसऱ्या बाजूने खाली आलो.

हवामान आम्हाला सोयीचे असेच होते. कधीकधी ढगातून बस जात होती, तवांग ला पाऊस येणार असा अंदाज होता. हिमालयात हवामान अचानक बदलते, काल जर असे ढगाळ वातावरण असते तर आम्हाला बर्फाचा आनंद घेता आलाच नसता. आज  धुके होते, पाऊस होता पण अधूनमधून पडणाऱ्या उन्हामुळे डोंगरावर खूप याक दिसत होते. त्या उन्हात सफरचंदाची झाडे त्यांच्या पांढऱ्या फुलांमुळे चकाकत होती.




मजल दरमजल करीत साधारण ४ च्या सुमारास आम्ही पुन्हा सेपोय ला पोहोचलो. जातांना होते तेच हॉटेल., जातांना होती तीच रूम ... हॉटेल छानच आहे ते. त्यात आज आपली मॅच होती.

जेवणात चायनीज होते, या हॉटेल मध्ये नेट पण चांगले होते. फोटो मिळाले, पाठविले, मेसेजेस पाठविले, आणि जगाच्या संपर्कात आलो परत...


या संपूर्ण प्रवासात मी अगदी मागच्या सीट वर होते, त्यामुळे सचीनशी, साठ्यांशी, भरपूर गप्पा मारल्या.  रात्री मस्त झोप झाली आणि दुसरे दिवशी ब्रेकफास्ट करून निघालो. ती तारीख होती २८ मार्च २०१६. आत्ता पर्यन्त आम्हाला अनुकूल असे हवामान मिळत गेले.





आज सकाळी बाहेर पडलो तर सगळीकडे धुके... आणि पाऊस... ५ फुटांवर पण नीट दिसत नव्हते. आता आम्ही निघालो तेजपुरकडे. त्या नागमोडी रस्त्याने आसाम- अरुणाचल ची बॉर्डर क्रॉस करून वाटेत दियांगखो नदी आणि टेगा व्हॅली ला पार करत ( मिलिटरी चा मोठा कॅम्पबेस) पोहोचलो साधारण ६०० वर्ष पूर्वीच्या नागमंदिर येथे.

८०-९० पायऱ्या चढून देवळात पोहोचलो. शंकराचे मंदिर आहे. वरुन खूप छान व्हयू दिसतो. आम्ही तेथे शंकराची आरती म्हटली, मस्त वाटले.


Destinatia
The Majestic
NAG MANDIR
ARUNACHAL PRADESH

वाटेत एक झुलता पूल लागला.



आता मात्र पावसाला जोरात सुरुवात होईल असे वाटत होते. पाऊस सुरू होण्यापूर्वी आम्ही बस थांबवून एके ठिकाणी उतरलो, धुक्यात चालायला ... अक्षरशः धुक्यात वाट हरवणे म्हणजे काय ते अनुभवले. दुर्गा मंदिर जवळ आले तेव्हा जोरात पाऊस सुरू झाला. पण गम्मत म्हणजे आम्ही पोहोचलो तेव्हा पाऊस थांबला., आमच्यासाठी...

... देवीचे दर्शन घेतले आणि मस्त गरमागरम चहा प्यायलो.

११:३० वाजले होते, आता पुन्हा  उलटा प्रवास... . बॉर्डर – सर्किट हाऊस जवळ येताच जेवलो. जातांना पण येथेच जेवलो होतो. छान गरम घरगुती जेवण.

तेजपुरला हॉटेल मध्ये जाण्याआधी अग्निगड आणि चित्रलेखा गार्डन पहिले.  बाणासुराने आपली मुलगी उषा हिला एकांतात ठेवण्यासाठी बांधलेला हा  गड आहे असे धर्मग्रन्थ  म्हणतात. गार्डन तसे यथातथाच पण अग्निगडवरून ब्रम्हपुत्रेचे दर्शन छान होते.

अग्निगडावर चित्रमय पद्धतिने एक कथा सांगितली जाते. बाणासूरची मुलगी आणि शंकराचा नातू यांची प्रेमकहाणी चितरलेली आहे म्हणे...अग्निगड ला पण साधारण १२० पायऱ्या चढायला लागल्या होत्या. पाय मात्र थोडे दुखत होते.





तेजपुर येथील हॉटेल पण छान होते. आमच्या हॉटेलचे नाव होते पाईनयार्ड. अगदी मार्केट मध्येच होते. संध्याकाळी बाजारात फेरफटका मारून आलो, थोडीफार खरेदी केली. जेवण पण छान होते. अविनाशने प्रत्येक ठिकाणी हॉटेल्स आणि जेवण छान दिले होते हे नक्की. तेजपुरला सायकलींची संख्या खूप आहे. येथील युंनिवर्सिटी खूप चांगल्या रॅंकची आहे. तसे शहर बऱ्यापैकी मोठे आहे. आता पुन्हा आम्ही आसाम मध्ये होतो.

रात्री जेवण, झोप आणि सकाळी प्रयाण कामाख्या मंदिराकडे... तारीख आली २९ मार्च २०१६. कामाख्या मंदिर आणि ब्रंहापुत्रेच्या पाण्यातील बोटिंग उरकून आम्ही गोहत्तीच्या हॉटेलला जाणार होतो. गुवाहाटीचे हॉटेल तेच होते जिथे आम्ही सुरूवातीला राहिलो होतो.

ब्रंहापुत्रेच्या पात्रात बोटीने आम्ही एका बेटावर असलेल्या उमानंद येथे गेलो. तेथे पण जवळपास ६०- ७० पायऱ्या चढाव्या लागल्या. तेथे शंकराचे देऊळ आहे. तिथे पण आम्ही शंकराची आरती म्हटली. ब्रंहपुत्रेच्या प्रचंड पात्रात बोटीतून जातांना मस्त वाटत होते. तिथून गेलो कामाख्या मंदिरात.

पार्वतीने एकदा शंकराकडे दक्ष राजा कडील यज्ञाला जाण्याचा हट्ट केला. त्यावरून तिचे आणि शंकराचे भांडण झाले. तेथे गेले असता दक्ष (पार्वतीचे वडील) याने शंकराचा अपमान केला. पार्वतीला आपल्या नवऱ्याचा अपमान सहन झाला नाही. तिने रागाने यज्ञकुंडात उडी घेतली. हे शंकराला कळताच त्याने तिचे शरीर घेऊन तांडव केले. शंकराला शांत करण्यासाठी विष्णूने त्या शरीराचे १०८ तुकडे केले. जेथे जेथे हे शरीराचे भाग पडले ती ठिकाणे शक्तिपीठ

म्हणून ओोळखली जाऊ लागली. या ठिकाणी पार्वतीच्या शरीराचा खालचा भाग एका कुंडात पडला. देवळाच्या गर्भगृहात गर्भाशय आणि खालील अवयव  आहेत असे मानतात. आषाढ महिन्यात देवीच्या रक्ताने ब्रम्ह्पुत्रेचे पाणी तांबडे होते. त्यावेळी ३ दिवस देऊळ बंद ठेवतात. कामदेवचा ‘काम’ त्याला येथेच पुन्हा मिळाला असेही मानतात.

७०-८० पायऱ्या चढून आम्ही देवळात पोहोचलो. खूप रांग असते दर्शनाला. पण ५०० रुपये दिले की वेगळी रांग... आमच्या चौघीपैकी माझ्या सकट दोघींनी याला नकार दिला. आम्ही बाहेरून दर्शन घेतले. बाकीच्या दोघी ५०० रुपये देऊन लहान रांगेतून दर्शन घेऊन आल्या. बोकड बळी देतात ती जागा पहिली, अजूनही बळी देणे सुरू आहे हे ऐकून विचित्र वाटले. असो... प्रत्येकाच्या श्रद्धेचा प्रश्न आहे हा...

चहा पिऊन निघालो. येथून १०० की.मी. वर कुमणी आणि तेथून मीटरगेजने अगरतला अशी ट्रेन जाते. आम्ही निघालो आता गुवाहाटीकडे .

थोडेफार गुवाहाटीचे साईट सीईंगच झाले. स्टेडियम, लॅंडमार्क हॉटेल (जेथे आपले खेळाडू राहतात) , उल्लुबरी, बरूआरोड, आपल्या मुंबई-पुण्या कडील रस्त्यांसारखे मोठे रस्ते, ट्राफिक, मोठे मॉल, ब्रांडेड गोष्टींची दुकाने...गुवाहाटी खूप गर्दीचे शहर आहे. उघडी गटारे, त्यामुळे असणारे भरपूर डास, आणि गर्दी असेच वर्णन करावे लागेल. आम्ही आसाम गव्हर्नमेंटच्या एका दुकानाशी थांबून खरेदी केली. या सगळ्यात ६:३० वाजले.

आम्ही भार्गव ग्रँड मध्ये पोचलो. हॉटेल छानच आहे.  हे हॉटेल हायवे वर असल्याने तशी गजबज नव्हती. जवळच मोठे बालाजीचे मंदिर आहे. आम्ही येतांना बालाजीचे मंदिर पहिले होते, बाकीच्यांना पहायचे होते. त्यामुळे आम्ही मात्र आराम केला. बाकीचे सकाळी लवकर बालाजी पाहून येणार होते. हे सुंदर देऊळ आमच्या  हॉटेल पासून अगदी १० मिनिटावर होते.

आता आम्ही निघणार होतो 3 ऱ्या राज्यात म्हणजेच मेघालयात. तारीख होती ३० मार्च २०१६.

गुवाहाटी ते शिलोंग असा प्रवास होता. मेघालयात पेट्रोल आणि डिझेल स्वस्त मिळते. अंतर होते १०० की. मी. राष्ट्रीय महामार्ग ६. वाटेत बांबू आणि सुपारीची लागवड भरपूर. कोळसा पण खूप. मेघालयातून देशभर कोळसा जातो असे कळले. येथील स्त्रीयांचे कपडे पण आसामपेक्षा वेगळे. खाली लुंगी सारखा कपडा , आणि त्यावर गळ्यातून घातलेला कफनी सारखा झगा... शिलोंग साधारणतः समुद्र सपाटी पासून ५००० फुटावर आहे. शिलोंग सुध्धा गुवाहाटी प्रमाणे गर्दीचे शहर. रस्त्यात अननसाच्या बागा. अविनाशने रस्त्यात थांबून ताजा, रसाळ आणि गोड अननस खायला घातला. नारळ पाणी पण प्यायलो. नारळवाल्याचे घर रस्त्याच्या पलीकडे. त्याच्याकडेच मग जंतर मंतर उरकले. माणसं खरे म्हणजे सगळीकडेच चांगली असतात. येथील माणसांना हिन्दी पण चांगले समजते.


Barapani lake

आणखी एक जाणवलेली गोष्ट म्हणजे येथे पक्षी खूप कमी आहेत, आहेत ते जंगलात, शहरी भागात पक्ष्यांची किलबिल फार कमी वेळा ऐकू येते. इथल्या भाषेत कुबले म्हणजे धन्यवाद. इथली आडनावे पण विचित्र, रस्त्यात बोर्ड दिसले ते वटवट, बकबक या नावाचे... आम्हाला मजाच वाटली.

एके ठिकाणी थांबून बारापानी  नावाचा एक सरोवर पहिला. बारा कोन असलेला लेक, या लेकचे पाणी संपूर्ण मेघालयला पुरविले जाते. उमियाम नदीवर धारण बांधून हे जलाशय १९६० मध्ये तयार केले. आसाम आणि अरुणाचल प्रमाणेच येथे सुध्धा पाणी मुबलक.

मेघालयात ख्रिश्चीयन्स पुष्कळ आहेत. शाळा आहेत, लोकांना इंग्रजी , हिन्दी समजते, ट्रॅफिक नियम पाळले जातात,गाड्यांची घुसाघूसी नाही, मुले सकाळी शाळेत जातात, थोडक्यात, प्रगति दिसते...

येथे  मातृसत्ताक पद्धत आहे. मुलगा लग्न करून मुलीच्या घरी येतो. पुरुष जास्त शिकत नाहीत, पण घराकडे लक्ष देतात. म्हणूनच कदाचित स्त्रियांच्या चेहऱ्यावर एक प्रकारचा आत्मविश्वास दिसतो.

येथे नेपाळ प्रमाणेच मोमोज मिळतात. रस्त्यावर आपल्याकडे जसे वडापाव तसे येथे मोमोज. एके ठिकाणी तर आम्हाला पाणीपुरीची गाडी दिसली.



आमच्या हॉटेल चे नाव होते लॅंडमार्क... छान होते. जवळच बेथनी हॉस्पिटल होते... आपले राष्ट्रपति डॉ. अब्दुल कलाम २०१५ मध्ये जेव्हा इथल्या आय आय एम मध्ये भाषण द्यायला आले होते आणि अचानक कोसळले, तेव्हा त्यांना या बेथनी हॉस्पिटल मध्येच आणले होते.

आमचे हॉटेल नागालॅंड हाऊसच्या बरोबर मागे होते. नागालॅंड हाऊस ही खूण होती आमचे हॉटेल सापडण्याची. मेघालय स्वच्छ आहे, आणि रस्ते उत्तम आहेत. हे रस्ते पाहून मुंबईतील बहुतांश रस्त्यांची लाज वाटते. या प्रदेशात मारुति ८०० गाड्या खूप जास्त आहेत, अवजड वाहने कमी...

शिलोंग मधील डॉन बोस्को मुझियम पाहायला आम्ही गेलो. जेवण आम्ही डॉन बोस्को मुझियम मध्येच केले. मोठ्ठं ताट भरून भात आणला त्याने... आम्ही सगळेच अवाक, आमचा एका आठवड्याचा भात होता तो... असो.

अप्रतिम डॉनबॉस्को मुझियम. म्युझियम पाहतांना भुबनेश्वर मधील स्टेट म्युझियमची आठवण आली. खूपच छान संग्रह आहे. पुर्वांचलातील सातही राज्यांविषयी माहिती- विविध प्रकारची माहिती येथे आहे. अनेक दालने  आहेत, प्रत्येक दालनात प्लाझ्मा टी. व्ही . आणि टच स्क्रीन आहेत  आणि हवी ती माहिती मिळवण्याची आधुनिक सोय उपलब्ध आहे, तसेच दालनातील दिवे तेथे कोणी असेल तरच लागतात. संग्रह पाहून, आणि ज्या नेटकेपणाने ते ठेवले आहे ते पाहून खरच कौतुक वाटते. प्रत्येक राज्याविषयी, त्यांचे कपडे, त्यांची भाषा, तेथील जाती, तेथील पिकं, त्यांच्या चाली-रीती, अशा अनेक गोष्टींचा संग्रह पाहायला मिळतो.



या डॉनबॉस्को म्युझियमचे उद्घाटन २०१० साली सोनिया गांधी यांच्या हस्ते झाले. उत्तर पूर्वेकडील राज्यांची माहितीपर दृकश्राव्य अशी एक १० मिनिटांची डोक्युमेंटरी आहे. अतिशय सुंदर आहे ती चित्रफीत.

म्युझियमच्या गच्चीवरून संपूर्ण शिलोंग छान दिसते. फ्रांस मधील आइफेल टोवर ची आठवण झाली. आम्ही वर गेलो आणि पाऊस थांबला त्यामुळे आम्हाला मस्त व्हयू बघायला मिळाला.

तेथून आम्ही विवेकानंद सेंटरला गेलो. तेथे पण अनेक गोष्टींचा संग्रह होता. मुझियम चांगले होते. आता थोडासा कंटाळा आला होता. हॉटेलला परत आलो आणि काही जण बाजारात गेले, काहींनी आराम केला. ८:३० वाजता जेवण होते. त्या हॉटेल मध्ये कोणती तरी कॉन्फरन्स असल्या मुळे आमची जेवणाची सोय एका वेगळ्या खोलीत केली होती. आम्ही जेवत असतांना  तेथे २ बायका आल्या. आमच्या ग्रुपचे झाले की त्यांचा ग्रुप तेथेच जेवणार होता आणि हे अविनाशना माहीत होते.  इथपर्यंत सगळे ठीक होते. त्यातील एकीने जिलबी हाताने उचलून खायला सुरुवात केली. अविनाश शांतपणे म्हणाले, तुम्ही प्लेट घेऊन खा, असे मध्ये हात लावू नका. त्या बाईला आला राग... लागली की मोठ्या मोठयाने भांडायला... बहुदा हिंदीभाषी होती. आम्ही पण मध्ये पडलो, ओरडता कशाला असे म्हणालो. ती निघून गेली बडबडत... आम्ही जेवण संपवून खोलीत आलो,पण नंतर असे कळले की तिचा नवरा सुध्धा  आला होता भांडायला ...भांडण्यात आपण मराठी माणसं थोडी कमीच पडतो हेच खरं! कशा कशा प्रकारच्या लोकांना तोंड द्यावे लागते हे सुध्धा कळले.

उद्या आमचा ग्रुप बरोबरचा शेवटचा दिवस. ३१ मार्च २०१६ . सर्व जण आग्रह करीत होते की तुम्ही पण या पुढील ३ राज्यात. पण ते शक्य नव्हते.

सकाळी ८:३० ला निघालो चेरापुंजीकडे. जगातील सर्वात जास्त पाऊस पडतो असे ठिकाण. चेरापुंजीचे पावसाचे पाणी, माती, बंगलादेश मध्ये जाते जेथे डोंगर नाहीत, आणि तेथील जमीन सुपीक करते. चेरापुंजी मध्ये पाण्याची टंचाई नसली तरी आसाम सारखे मुबलक ही नाही पाणी... आहे की नाही गम्मत... .

एयरफोर्स स्टेशन चे म्युझियम पाहायला जायचे होते. तेथूनच शिलोंग पीक - व्हयू पॉइंट होता. परंतु ते १० वाजता उघडणार होते. त्यामुळे आम्ही तेथे न थांबता पुढे निघालो. या रस्त्यात सगळीकडे बटाट्याची लागवड होती. मोठ्या प्रमाणात बटाट्याची शेती, अनेक प्रकारचे फर्न्स, पाईन्सची झाडे आणि मधून मधून दिसणारी आर्मीची स्टेशन्स ... एयर कमांड चे ऑफिस पाहिले परंतु येथे आर्मी अरुणाचल प्रमाणे पावलोपावली नव्हती. मेघालयच्या मानाने अरुणाचल हा फारच दुर्गम आणि दुर्लक्षित भाग आहे असे वाटले. कारण अरुणाचल मध्ये शिक्षण दिसत नाही, विकास दिसत नाही, सुधारणा दिसत नाहीत...

सर्व प्रथम आम्ही गेलो एलिफेंट फॉल पाहायला. हा धबधबा हत्तीच्या डोक्याच्या आणि सोंडेच्या आकाराचा आहे. तो ३ पातळीवरून दिसतो. मार्च महिना असूनही पाणी भरपूर होते. तेथेच आम्ही बहुतेक सर्वांनी मेघालयचे ड्रेस घालून फोटो काढले, थोडा डान्स केला, मजा आली.


एलिफेंट फॉल

मेघालय मध्ये कोळसा भरपूर. छोटे छोटे बोगदे खणून कोळसा काढण्याचे काम सुरू होते. आम्ही एके ठिकाणी थांबून कोळशाची खाण जवळून पाहिली.

ऑरेंज रुट्स नावच्या हॉटेल मध्ये जेवण घेतले, जेवण उत्तम... तेथेच खूप ओर्किड्स पाहायला मिळाली. अद्भुत रंग आणि विविध आकाराची फुले पाहायला मिळाली.

तेथून निघालो आम्ही मौसमई केव्स कडे. मेघालयातील जैनतीय, खाशी, आणि गारो या पर्वत रांगांमधील या गुहा, गुंफा. चेरापुंजीतील सोहरा या ठिकाणी या गुंफा आहेत. अशा जवळपास २० गुंफा आहेत ज्या काही किलोमीटर लांब आहेत ... या गुंफा आहेत चुन्याच्या दगडांच्या. स्तलेग्टईट्स आणि स्तलेग्मईट्स चे ( लाईम स्टोन) विविध आकार पाहायला मिळतात. अतिशय सावधपणे, उंचीचा अंदाज घेत आत शिरावे लागते. आत गेल्यावर दगडांचे विविध आकार पाहून अचंबित व्हायला होते. हे सर्व आकार नैसर्गिकरित्या तयार झालेले आहेत. अगदी झोपून नाही पण वाकून वाकून जावे लागते. निसर्गाचा चमत्कारच जणू...

तेथून गेलो आणखी एका धबधब्याकडे, म्हणजेच नोहकलिकोई कडे. सुंदर स्पॉट होता. भारतातील सर्वात उंचावरून - ११९० फुटवरून पडणारा धबधबा! नोहकलिकोईचा खाशी भाषेतील अर्थ आहे , लिकाई ची उडी. असे म्हणतात की तेथून लिकाई नावच्या स्त्रीने स्वतःचा जीव दिला. या लिकाईची एक गोष्ट आहे तिने जीव का दिला त्याची.

Nohkalikai falls



वाटेत चहा घेऊन आम्ही शिलोंगच्या लायमुकरा मार्केट बघून ५ :४५ ला हॉटेल वर आलो. पाऊस पडून गेला होता. हवेत गारठा जाणवत होता. संध्याकाळी मॅच होती त्यामुळे सर्वजण आपआपल्या खोलीकडे निघाले. गुप्तेकाकांकडून मिठाई होती ती खाल्ली आणि झोपलो. उद्या सकाळी आमची वाट वेगळी होती. आमची मूळ बस काही कारणाने दुरुस्त होऊन गौहत्तीहून रात्रीच आली होती. आम्ही आत्ताच्या बसने परत गौहत्तीला जाणार होतो आणि बाकीचा ग्रुप मूळ बस घेऊन त्यांच्या पुढील प्रवासासाठी निघणार होता.

सकाळी ब्रेकफास्ट करून निरोप घेऊन , फोटो काढून ग्रुपचा निरोप घेतला. पुढील वर्षी या ग्रुप बरोबर आणि अविनाश बरोबर दुसरी टूर करायची असे ठरवून अखेर बाय बाय करून निघालो.

अविनाश आणि सचिनचा पण निरोप घेतला आणि परतीच्या प्रवासाला सुरुवात केली. आम्ही आता एयरपोर्ट वर जाणार होतो आणि मुंबईची फ्लाइट पकडून मुंबईला परत. एखाद्या टूर ऑपरेटर बरोबर केलेली ही आमची पहिलीच टूर. अनुभव खूप चांगला होता. पाहू या आता पुन्हा कधी योग येतो ते. नवीन सहप्रवासी , नवा अनुभव, नवी ठिकाणं.... भारतात अजून खूप काही पहायचे बाकी आहे.

दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण…

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com